स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ नांदेड सामाजीक शास्त्र शाखेतील इतिहास विषयातील पीएच.डी हया पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

-संशोधनशिर्षक-

''ठाणे जिल्हयातील प्रमुख आदिवासी—कोकणा, वारली, ठाकूर व कातकरीच्या बदलत्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास''

संशोधन विद्यार्थी
प्रा.गुरुनाथ मावंजी घुटे
मु.वसुरी(बोरसेपाडा), पो.माले, ता.विक्रमगड, जि.पालघर
पीन.नं.421303

:संशोधन मार्गदर्शक:
डॉ.बी.एस.क्षिरसागर
इतिहास विभाग प्रमुख शिवाजी कॉलेज हिंगोली

संशोधन केंद्र
समाजीक शास्त्र विभाग
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेड.

‘‘ठाणे जिल्हयातील प्रमुख आदिवासी–कोकणा, वारली, ठाकूर व कातकरीं च्या बदलत्या आर्थिक सामाजिक स्थितीचा अभ्यास’’

संशोधन विषयनिवडीमागील भूमिका/प्रस्तावना:

आदिवासी म्हणजेच मूळ निवासी त्यांनाच आदिम जमाती असे म्हणतात. ज्यावेळी आर्यांनी भारतात आगमन केले त्यावेळी मूळचे सिंधूवासीय व आर्य यांच्यात संघर्ष झाला. त्यामध्ये सिंधुवासीयांचा पराभव झाला व त्यांनी आर्यांची गुलामी न स्वीकारता अरण्यांचा किंवा जंगलांचा आश्रय घेतला तेच हे आदिवासी होय. पण पराभूत असल्याने ते मूळ मानवी समूहापासून दुर राहिले म्हणुन ते लाजरे, बुजरे व न्युनगंडाची भावणा स्वत:शिच बाळगत राहीले.

भारतात सर्वच प्रदेशात आदिवासी जमाती वास्तव्य करतात. तसेच महाराष्ट्रातील ठाणे जिल्हयात आदिवासींचे प्रमाण मोठे आहे. या जिल्हयात साधारणता कोकणा, वारली, क–ठाकूर, म–ठाकूर, कातकरी या प्रमुख आदिवासी जमाती राहतात. या जमाती प्रामुख्याने डहाणू, जव्हार, विक्रमगड, मोखाडा, शहापूर, मुरबाड, वाडा, वसई या डोंगराळ किंवा अरण्यमय तालुक्यामध्ये/प्रदेशांमध्ये दिसून येतात.

नागरी वस्तीपासून दुर अरण्यात हयांचे वास्तव्य असल्याने त्यांच्यामध्ये आर्थिक मागासलेपणा दिसून येतो. कारण उत्पादनाची सर्व साधने नैसर्गिक आहेत. शेती पारंपारीक पद्धतीने केली जात असल्याने उपजिविकेचे साधन म्हणुन तिच्याकडे पाहिले पाहिले जाते. पण डोंगराळ जमीन कमी सुपिक असल्याने उपासमारीचे संकट नेहमी त्यांच्यावर पहारा करते.

असे जरी असले तरी प्रस्तुत अभ्यास निवडीच्या कालावधीत ठाणे जिल्हयातील आदिवासी प्रदेशात क्रांतीकारी बदल झाला आहे. आदिवासी आश्रमशाळा व इतर शैक्षणिक संस्थांमधुन सुशिक्षित तरुणवर्ग बाहेर पडला आहे. शैक्षणिक पात्रता व शाासकीय धोरणांचा फायदा घेऊन उच्चपदस्त विराजमान झाला आहे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था (I.T.I.) मधून प्रशिक्षण घेऊन औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. इतकेच नव्हे तर नगदी पिके घेऊन शेतीमध्ये ही क्रांती घडवून आणली आहे.

संशोधनाची आवश्यकता/प्रयोजनः

आदिवासींची न्यूनगंडता, बुजरेपणा कमी झालेला नाही किंवा समाजातील उच्च वर्ग त्यांच्याकडे हीन दृष्टीने बघतो. त्यामुळे आजचा आदिवासी समाजाला समानतेची वागणूक दिल्याचे दिसत नाही. प्रस्तुत विषय अभ्यास निवडीतुन समाजामध्ये जनजागृती करण्याचा हेतु आहे व तो साध्य होईल अशी शाश्वती आहे.

तसेच आदिवासी विकास योजनेच्या नावाखाली प्रचंड निधी लाटला जातो. पण प्रत्यक्ष त्याचा फायदा किती लोकांना होतो यांच्यावरही प्रकाश टाकण्याचे प्रयोजन आहे. हे असे क्षेत्र आहे की, या ठिकाणी निधी खर्च केला जातो पण त्याचे कार्य किंवा विकासाचा आलेख दाखवला जात नाही. आदिवासी जमातींना स्वत:चा विकास करण्यासाठी आपल्या माणसीकतेमध्ये काय बदल करणे गरजेचे आहे याचेही विचार मंथन केले जाईल. या दृष्टीने प्रस्तुत विषयाची आवश्यकता आहे.

संशोधन विषयाचे महत्त्वः

'ठाणे जिल्हयातील प्रमुख आदिवासी जमातींच्या बदलत्या आर्थिक स्थितीचा ऐतिहासीक अभ्यास' या पीएच.डी संशोधन कार्यातुन आदिवासींच्या आर्थीक मागासलेपणाच्या मूळावर प्रकाश टाकण्यास मदत होईल. सामाजिक स्थीती, रिवाज, रुढी–परंपरा यांचे आकलन होण्यास मदत होणार आहे. योजनांचा आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे आदिवासी तरुणाईला व इतर समाजालाही या गोष्टींचा उलगडा होणार आहे.

तसेच काही आदिवासी तरुणाईने संकटांवर मात करुन यशाचे शिखर गाठले आहे. त्यांचा आदर्श समाजा समोर उभा करता येईल. एकंदरीत सामाजिक समतेचा हेतु साध्य होईल. नवशिक्षीत तरुणाईला आदिवासींच्या आर्थीक बदलाचा मागोवा घेता येईल. तसेच ज्या–ज्या व्यक्तींना आदिवासींचे जीवनमान समजून घ्यावयाचे असेल त्यांना अभ्यासक व संशोधक यांना या शोध प्रबंधांचा उपयोग होईल. या दृष्टीने प्रस्तुत विषयाचे तहत्त्व मोठे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१) इतर आदिवासी प्रदेशापेक्षा ठाणे जिल्हयातील प्रमुख आदिवासी जमातींचे वेगळेपण अधोरेखित करणे.

२) ठाणे जिल्हयातील प्रमुख आदिवासी जमातींच्या आर्थिक विकासाचा आढावा घेऊन त्याचे बदलते स्वरुप स्पष्ट करणे.

३) आदिवासींच्या सामाजिक, धार्मीक, सांस्कृतीक परंपरांचा आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचे मूल्यमापन करणे.

४) एकीकडे शासकीय योजनाद्वारे आदिवासींवर होणारा कोटयावधींचा खर्च तर दुसरीकडे त्याच आदिवासी जमातीची वाढत असलेली दैनावस्था यावर प्रकाश टाकणे.

५) ठाणे जिल्हयातील आदिवासी जमातींची आर्थिक स्थिती बदलाची बलस्थाने आणि मर्यादांचा अभ्यास करणे.

६) बदलत्या आर्थीक स्थितीचा आदिवासी समाजाला झालेल्या फायद्या/तोटयाचे मूल्यमापण करणे.

संशोधनाची गृहितके:

१) ठाणे जिल्हयातील प्रमुख आदिवासी जमातींच्या आर्थीक स्थितीतील बदल सर्व देशातील आदिवासी समाजाला मार्गदर्शक ठरणारा आहे.

२) ठाणे जिल्हा मुंबई उपनगराला लागुन असल्याने नागरी सेवा—सुविधांना, औद्योगिक धोरणांना आर्थीक बदलामध्ये महत्त्व आहे.

३) आदिवासींच्या अस्मितेपेक्षा अस्तित्ववाद मोठा आहे.

४) व्यथा, वेदना, शोषण, शासकीय फसवी धोरणे आदिवासींच्या आर्थीक प्रगतीच्या आड आली आहेत.

५) आर्थीक अप्रगतीला निरक्षरता, अंधश्रद्धा, बुजरेपणा, न्युनगंडता कारणीभूत ठरली आहे.

६) आदिवासींचे श्रम, कष्ट भारतीय अर्थव्यवस्थेला हातभार लावणारे आहेत.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोध प्रबंधाचे संशोधन करतांना प्रथम जिल्हाधिकाारी कार्यालय ठाणे यांच्याकडुन सर्व माहिती संकलीत केली जाईल. उदा. २००१ ते २०११ सालापर्यंत आदिवासी लोकसंख्या त्यांची टक्केवारी, पुरुष–स्त्री, साक्षर, निरक्षर, आर्थीक टक्केवारी इ. तसेच ठाणे जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी बॅकामध्ये आदिवासींची बॅकखात्यांच्या माहितीचे संकलन केले जाईल. आदिवासी विकास योजनांच्या माहितीचे संकलन केले जाईल आणि संशोधनानुसार ग्रंथालयीन, क्षेत्रीय, मुलाकत अभ्यास पद्धतीचा अवलंब केला जाईल. मुळातच कोणत्याही संशोधनाचा हेतु सामाजिक हित साधने हा आहे तो साध्य होतो का? याचे वस्तुनिष्ठ निष्कर्ष नोंदविले जातील. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासीक संशोधन पद्धतीमध्ये वर्णनात्मक, विश्लेषनात्मक, नमुना, निवड पद्धत व संदर्भ ग्रंथ पद्धतीचा आधार घेतला जाईल.

संशोधनाचे क्षेत्र व मर्यादा:

संशोधनाचा अभ्यास विषय 'ठाणे जिल्हयातील प्रमुख आदिवासी जमातींच्या बदलत्या आर्थिक स्थितीचा ऐतिहासीक अभ्यास' हा असल्याने संशोधनाचे क्षेत्र ठाणे जिल्हयापुरते मर्यादित राहील. तसेच ते काही प्रमुख जमाती उदा.कोकणा, वारली, क–ठाकुर, म–ठाकुर, कातरी या जमातींपुरता मर्यादित राहील. संशोधनाचा कालावधी २००१ ते २०११ हा असल्याने याच कालावधीतील आदिवासींच्या आर्थिक बदलांचा ऐतिहासीक अभ्यास केला जाईल.

ठाणे जिल्हयाप्रमाणेच महाराष्ट्र, भारत व जगामध्ये अनेक आदिवासी जमाती राहतात. पण त्यांचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करता येणार नाही किंवा केला जाणार नाही. ही या संशोधनाची मर्यादा राहील.

तत्थ संकलन व तत्थ विश्लेषण:

ठाणे जिल्हयातील आदिवासी विकास प्रकल्प जव्हार व शहापूर येथुन आदिवासी विकास योजना व विकास योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेतलेली आकडेवारी संकलीत केली जाईल. तसेच ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातुन आदिवासींच्या आर्थिक विकासाची टक्केवारी घेतली जाईल. या व्यतिरिक्त प्रश्नावली,

मुलाखत, सर्वे या मार्फत तत्थ संकलन केले जाईल. व त्याचे विश्लेषण आलेख, टक्केवारी यामार्फत करुन कार्यकारण भाव विचारात घेऊन वर्णनात्मक विश्लेषण केले जाईल.

पूर्व संशोधनाचा आढावा:

डॉ.गोविंद गारे यांच्या ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या संशोधनाचा आढावा घेतला जाईल, अनुताई वाघ यांच्या कोसबाडच्या टेकडीवरुन या साहित्याचा आढावा घेतला जाईल. तसेच प्रा.डॉ.एस.एम. वाघ यांच्या 'ठाणे जिल्हयातील आदिवासींचा राजकीय सहभाग' या शोध प्रबंधाचा आढावा घेतला जाईल. त्याप्रमाणे प्रा.डॉ.विजय कुलकर्णी यांच्या 'ठाणे जिल्हयाचा ऐतिहासीक वारसा' या शोध प्रबंधाचाही आढावा घेतला जाईल याच बरोबर इतर संशोधनाशी संबंधीत शोध प्रबंधाचा आवश्यकते नुसार आढावा घेतला जाईल.

प्रकरणांची विभागणी:

प्रकरण १:

प्रस्तावना. (संशोधन पद्धती)

प्रकरण २:

ठाणे जिल्हयातील प्रमुख आदिवासी जमातींचे सामाजिक व आर्थिक स्थितीचे स्वरुप.

प्रकरण ३:

आदिवासींच्या विकासाच्या योजना.

प्रकरण ४:

ठाणे जिल्हयातील प्रमुख आदिवासी जमातीच्या आर्थिक स्थितीतील बदल.

प्रकरण ५:

सारांश व निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ सूची

आधारभुत संदर्भग्रंथ सुची:

१) चुनेकर सु.रा. पठारे रंगनाथ ‘संशोधन स्वरुप आणि पद्धती’, शिक्षण प्रसारक संस्था संगमनेर, प्र.आ. १९८३.

२) कऱ्हाडे स.दा., ‘संशोधन सिद्धांत आणि पद्धती’, लोकवाङ्मय गृह, मुंबई प्र.आ. १९७७.

३) डॉ. प्रदिप आगलावे, ‘सामाजिक संशोधन पद्धती’, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर.

४) डॉ. सुधिर बोधनकर, प्रा. विवके अलोणी, ॲड. मृणाल कुलकर्णी, ‘सामाजिक संशोधन पद्धती’, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर.

५) गिरीधारी भा.व्यं., ‘आरस आदिवासी जीवन शैलीचा’ युगांतर प्रकाशन नाशीक प्र.आ. २००३.

६) संगवे विलास, आदिवासींचे सामाजीक जिवन, पॉप्युलर प्रकाशन मुंबई द्वि.आ. १९७८.

७) नाडगोडे गुरुनाथ, ‘भारतीय आदिवासी’ पुणे प्र.आ. १९७९.

८) मांडे प्रभाकर, ‘भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या’, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद २००३.

नियतकालिके:

१) कदम लक्ष्मण, माझा आदिवासी, आदिमानव, हाकारा, एप्रिल – जुन १९८३

२) अस्मितादर्श, एप्रिल – जुन १९८९.

वर्तमानपत्रे:

१) दैनिक सकाळ.

२) दैनिक लोकमत.

३) दैनिक महाराष्ट्र टाईम्स.

४) दैनिक पुण्यनगरी

:संशोधन मार्गदर्शक:
डॉ.बी.एस.क्षिरसागर
इतिहास विभाग प्रमुख शिवाजी कॉलेज हिंगोली
Mb. 9850864010
Email – drkbs003@gmail.com

संशोधन विद्यार्थी
प्रा.गुरुनाथ मावंजी घुटे (सहय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग)
Email - gurunath_ghute@rediffmail.com
(Mb. No- 9657261974/7045739663)
(शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय, शिवळे ता.मुरबाड, जि.ठाणे)

Filename:	P.H.D
Directory:	C:\Users\admin\Desktop
Template:	C:\Users\admin\AppData\Roaming\Microsoft\Templates\Normal.dotm
Title:	
Subject:	
Author:	sairam
Keywords:	
Comments:	
Creation Date:	08-Sep-16 1:41:00 PM
Change Number:	2
Last Saved On:	08-Sep-16 1:41:00 PM
Last Saved By:	admin
Total Editing Time:	1 Minute
Last Printed On:	08-Sep-16 1:58:00 PM

As of Last Complete Printing

Number of Pages: 8

Number of Words: 1,519 (approx.)

Number of Characters: 8,662 (approx.)